नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/०९/२०२६ (शुक्रवार)

.........................................................................................

## २४ तासाच्या आत घरफोडीचा गुन्हा उघड, ०२ आरोपी अटक
## वडोदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. शशांत एन. एम. सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांच्या नेतृत्वात वडोदा पोलीसांनी २४ तासाच्या आत घरफोडीचा गुन्हा उघड करून एकुण १,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करत ०२ आरोपीला अटक केले आहे.**

पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत फिर्यादी यांनी पोलीस ठाणे, दिनांक २३/०९/२०२६ रोजी वडोदा येथे येवुन रिपोर्ट दिली की, कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचे मागील दरवाज्याची कडी कोंडा तोडून घरात प्रवेश करून त्यांचे कानातील सोन्याचे दागिने चोरी करून घेऊन गेले आहे. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

वडोदा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील आरोपी नामे **१) आयुषराम स्वरूप चौधरी, वय २३ वर्ष, रा. वार्ड नंबर २३, कडूजी काळे यांचे घराजवळ वडोदा तालुका, कामठी जिल्हा नागपूर २) अजय रामराज पटले, वय २४ वर्ष, राहणार देवरी हनगाव, जिल्हा मोहगंज, मध्य प्रदेश ह. मु. भोले पेट्रोल पंपचे मागे, गवळीपुरा नागपूर** यांनी सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. दिनांक २४/०९/२०२६ रोजी नमुद आरोपी यांना वडोदा येथुन ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्हा

केल्याची माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांकडुन ९.५ ग्रॅम सोन्याचा ऐवज किंमती १,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्हयातील **आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**






## चोरीचा गुन्हा उघड, ०२ आरोपीत अटक,
## ३ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन कोंढाळी येथे दाखल कलम ३०३(२) भा.न्या.सं मधील शेताच्या कुंपणाकरिता लावलेले लोखंडी काटेरी तार चोरीचा गुन्हा उघडकीस आणुन एकुण २ आरोपींना अटक केले आहे. आरोपीतांकडुन ०३ लाख ५५ हजार २५० रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक २४/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयात **आरोपी नामे कमलेश बाळकृष्ण उईके, वय ३७ वर्षे, रा. रामभाऊ माळी नगर, मुरली ता. काटोल याचा सहभाग असल्याची माहीती प्राप्त केली. नमुद आरोपीला मुरली गावातुन ताब्यात घेवुन त्याचे कडे** कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन कोंढाळी परिसरात चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली. तसेच **आरोपी क्रं २) ब्रिजगोपाल मयादीन साहू, वय ३२ वर्षे, रा. कमलेश किराणा जवळ, गंगानगर, काटोल रोड, नागपूर याला चोरीचा माल विकल्याची माहीती दिली. पोलीसांनी सदर प्रकरणी आरोपी क्र. १ आणि २ यांना अटक केली आहे.**

**पोलीसांनी आरोपीतांकडुन १) चोरीस गेलेली ४०० मीटर लोखंडी काटेरी तार किंमती ५,२५०/—रूपये गुन्ह्यात वापरलेले मालवाहु वाहन एम एच—३१/एफ बी—३२६० किंमती ३,५०,०००/—रूपये असा एकूण किंमती ३,५५,२५०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**




## अरोली पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन अरोली हद्द्दीतील अवैध दारू व्यवसायात सराईत आरोपी नामे प्रकाश हरिशचंद भिवगडे, वय ४५ वर्ष, रा. धर्मापुरी, ता. मौदा, जि. नागपूर याला महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार केले.**

सराईत गुन्हेगार नामे **प्रकाश हरिशचंद भिवगडे, वय ४५ वर्ष, रा. धर्मापुरी ता. मौदा, जि. नागपूर** याचेवर अवैध दारू बाबत **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव अरोली पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या

मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून आरोपी **प्रकाश हरिशचंद भिवगडे, वय ४५ वर्ष, रा. धर्मापुरी ता. मौदा, जि. नागपूर** याला **३ महीन्यांकरीता** नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार आरोपी प्रकाश हरिशचंद भिवगडे**

## अवैधरित्या विनापरवाना मोहाफुल दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ६३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय रामटेक यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २४/०९/२०२६ रोजी श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, रामटेक येथील पथका अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीता असतांना त्यांना खात्रीशीर गोपनिय माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरीत्या मोहाफुल दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ पंचाळा रोड चित्रकुट रिसोर्ट जवळ रामटेक येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान सी. डी. डिलक्स मो.सा. क्र. एम

एच–४०/डी ए–९२८० मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता मोहाफुल दारू मिळुन आली. **आरोपी नामे १) कैलास रामकृष्ण पाटील, रा. बोरी टोली त.रामटेक २) अर्जुन धोंडबा तरारे, वय ५५ वर्षे, रा.पंचाळा त.रामटेक हे अवैधरीत्या मोहाफुल दारूची वाहतुक करतांना मिळुन आले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) ३० लिटर मोहाफुल दारू किंमती ३०००/–रूपये २) सी. डी.डिलक्स मो.सा. क्र. एम एच–४०/डी ए–९२८० किंमती ६०,०००/–रूपये, असा एकुण किंमती ६३,०००/– रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी यांचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध जुगार खेळणाऱ्या ०३ आरोपींवर गुन्हे दाखल

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस स्टेशन बेला आणि केळवद हद्दीत अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये खालील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे १. विनोद जनार्धन फरकाडे, वय ४२ वर्ष २. राजु किसनाजी येसनसुरे वय ३५ वर्ष दोन्ही रा. शेडेश्वर ता. उमरेड जि. नागपुर हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर **०१ गुन्हा नोंद** करण्यात आला आहे. **तसेच** सतिष नामदेवराव खडसे वय ४२ वर्ष रा. वार्ड क्र.०१ बेला ता. उमरेड जि. नागपुर हा अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर **०१ गुन्हा नोंद** करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी कृष्णा बापुराव बोरकर वय ५२ वर्ष रा कन्हीयाडोल ता. कळमेश्वर , जि. नागपुर हा अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर **०१ गुन्हा नोंद** करण्यात आला आहे.

**वर प्रमाणे आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सट्टापट्टी साहित्य व ५२ ताशपत्ते व नगदी एकुण ५७६३/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री, वाहतुक आणि सेवन करणाऱ्यांवर १४ गुन्हे दाखल,

**दिनांक २४/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १४ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) चेतन विजयरावजी पेठे, रा. भाउसाहेब दिग्रस काटोल २) दिवाकर दौलत मारबते, रा. रिधोरा काटोल, जि. नागपुर ३) विशाल वसंतराव राउत, रा. भाउसाहेब दिग्रस काटोल ४) गोपाल युवराज कामडी, वय २४ वर्ष, रा. अर्जुननगर शेठे ले आउट काटोल यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) नवसू गोपाळा महाजन, वय ३५ वर्ष, रा. धवळपेठ, ता. जि. नागपूर २) किशोर सूधाकर काकडे, वय ३१ वर्ष, रा. बोरखेडी रेल्वे, ता. जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी नामे १) विनोद महादेव बागडे, वय ४५ वर्ष, रा. नागलवाडी, ता. सावनेर, जि.नागपूर २) अंकुष गोमाजी परतेकी, वय ५० वर्ष, रा. कोरामेटा, ता. सावनेर, जि.नागपूर ३) सुनिल अनिल शेडके वय ३९ वर्ष रा. मांग मोहल्ला खापा ता. सावनेर जि.नागपूर याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत** आरोपी नामे १) किशोर वामणराव बांबोडे, वय ४३ वर्ष, रा. रामपुरी ता.सावनेर, जि.नागपुर २) देवमण श्रीपत बांबोडे, वय ४६ वर्ष, रा. रामपुरी, ता. सावनेर, जि.नागपुर ३) हिरालाल शिवनंदन बनके वय ३४ वर्ष रा. पालाखेड, ता. मोहखेड, जि. छिंन्दवाडा (म.प्र), ह.मु. संदीप बागडे रा. मंगसा, ता. सावनेर, जि. नागपुर ता.सावनेर, जि.नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत आरोपी नामे १. कैलास रामकृष्ण पाटील, रा. बोरी टोली, त. रामटेक २. अर्जुन धोंडबा तरारे, वय ५५ वर्षे, रा. पंचाळा त. रामटेक यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** आरोपी नामे धिरेश पंचम मेश्राम, वय ४० वर्ष, रा. खुर्सापार, ता. उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद,

नमुद कारवाईत एकुण ६२१० मिली देशी दारू, ३६ लिटर मोहाफुल दारू, ०१ मोसा. असा एकुण ६६,३६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर